# रा से यो व ग्रामीण रुग्णालय बोदवड येथील I.C.T.C. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने HIV पंधरवडा निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

(1.12.2019) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे HIV/AIDS बाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने रॅली, व्याख्यान, शपथविधी, मानविसाखळी इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला HIV जनजागृतीची शपथ रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.चेतनकुमार शर्मा यांनी दिली व HIV ची लागण कशी होते व या विषाणूची लागण झालेल्या व्यक्तींबरोबर राहिल्याने काही धोका उद्भवतो का या वर माहिती दिली. त्यानंतर मानविसाखळी तयार करण्यात आली व महाविद्यालय ते ग्रामीण रुग्णालय बोदवड पर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅली संपल्या नंतर महाविद्यालयात ग्रामीण रुग्णालयाततील I.C.T.C. चे श्री. शिरसाठ सर यांनी HIV बद्दल मार्गदर्शन केले व श्री किशोर सोनवणे यांनी HIV चाचणी बद्दल माहिती दिली.

सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. देवसिंग पाटील, ग्रामीण रुग्णालयातील डॉ. अमोल गिरी, रासेयो सहा. अधिकारी नितेश सावदेकर व डॉ. विनोद चौधरी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी परिश्रम घेतले




